Government of Maharashtra

**GOVERNMENT POLYTECHNIC, PUNE**

(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
University Road, Shivaji Nagar, Pune - 411016

**Phone: 020-25676818, 25559200** **Email: principal.gppune@dtemaharashtra.gov.in**

जा.क्र. शातंनिपु/ संस्थास्तर _प्रवेश_फेरी/२०२२-२३ दिनांक: २२/०९/२०२२

# संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी

## (Institute Level Vacancy Round)

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी CAP Round-III नंतर रिक्त असलेल्या जागांसाठी संस्थास्तरीय प्रवेश फेरी खालील वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे.

| अ. क्र. | पदविका वर्ष | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | प्रथम वर्ष | २४/०९/२०२२ |
| ०२ | प्रथम वर्ष * व थेट द्वितीय वर्ष | २७/०९/२०२२ |
| ०३ | थेट द्वितीय वर्ष | २९/०९/२०२२ |

*प्रथम वर्षाच्या दिनांक २४/०९/२०२२ रोजीच्या संस्थास्तर प्रवेश फेरीमध्ये जागा रिक्त राहिल्यास दिनांक २७/०९/२०२२ रोजीची फेरी घेण्यात येईल.

## • या प्रवेश-फेरीसाठीची पात्रता

१] CAP अंतर्गत नोंदणी केलेले (यापूर्वी प्रवेशित अथवा अ-प्रवेशित) तसेच Non-CAP अंतर्गत नोंदणी केलेले सर्व विद्यार्थी या प्रवेश-फेरीसाठी पात्र असतील.

२] अद्याप कोणत्याही प्रकारे नोंदणी न केलेले इच्छुक विद्यार्थीसुद्धा वरील दिनांकास आयोजित केलेल्या प्रवेश फेरीसाठी पात्र असतील. मात्र अशा इच्छुक विद्यार्थ्यांना त्यांचे नावाची नोंदणी गुगल फॉर्म लिंक द्वारे करणे बंधनकारक असेल. (याबाबत सविस्तर माहिती पुढे देण्यात आलेली आहे.)

## • या प्रवेश-फेरीसाठी रिक्त जागांबद्दलची व्याख्या

१] प्रथम वर्षासाठी CAP Round-III अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना शासकीय तंत्रनिकेतन,पुणे या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने Allotment घोषित झालेले होते तथापि त्यांनी दिनांक २२/०९/२०२२ रोजी सायंकाळी

०५: ०० वाजेपर्यंत Reporting केलेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांकरिता **दिनांक २४/०९/२०२२ व दिनांक २७/०९/२०२२** रोजी संस्था- स्तरावर प्रवेश-फेरी राबविण्यात (Institute Level Vacancy Round) येत आहे.

तसेच थेट द्वितीय वर्षासाठी CAP Round-III अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना शासकीय तंत्रनिकेतन,पुणे या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने Allotment घोषित झालेले होते तथापि त्यांनी दिनांक २४/०९/२०२२ रोजी सायंकाळी ०५: ०० वाजेपर्यंत Reporting केलेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांकरिता **दिनांक** २७/०९/२०२२ व २९/०९/२०२२ रोजी संस्था- स्तरावर प्रवेश-फेरी राबविण्यात (Institute Level Vacancy Round) येत आहे.

२] मात्र या रिक्त जागा फक्त शाखा-निहाय असलेल्या नियमित प्रवेश-क्षमता (sanctioned Intake) पैकी रिक्त राहिलेल्या जागा असतील. (EWS / TFWS अंतर्गत यापूर्वी Allotment घोषित झालेले परंतु reporting न केल्याने रिक्त राहिलेल्या जागा संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी म्हणजेच Institute Level Vacancy Round साठी उपलब्ध नसतील.)

- **या प्रवेश-फेरी अंतर्गत प्रवेशीत होणारे विद्यार्थ्यांना उपलब्ध शिष्यवृत्ती**

१] सदर प्रवेश-फेरी रिक्त जागा भरण्यासाठी असून या फेरीत प्रवेशित होणारे विद्यार्थी यांना अल्प-संख्यांक शिष्यवृत्ती सारख्या मोजक्याच प्रकारच्या शिष्यवृत्त्या मिळू शकतात.

२] राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती तसेच डॉ.पंजाबराव देशमुख शिष्यवृत्तीस या प्रवेश-फेरीत प्रवेशित विद्यार्थी पात्र नसतील.

- **शनिवार दिनांक २४/०९/२०२२** व **मंगळवार दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या प्रवेश-फेरीसाठी महत्वाच्या सूचना**

१] प्रथम वर्षासाठी **दिनांक २४/०९/२०२२** व **दिनांक २७/०९/२०२२** रोजी रोजी संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी म्हणजेच Institute Level Vacancy Round साठी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश-फेरीसाठीची नोंदणी गुगल फॉर्म द्वारे माहिती भरून सबमिट करणे बंधनकारक असेल. गुगल फॉर्म द्वारे नोंदणी करण्यासाठीची कालमर्यादा **दिनांक २४/०९/२०२२** व **दिनांक २७/०९/२०२२** रोजी दुपारी ११:०० वाजेपर्यंतच असेल. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश फेरी साठी संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

- **मंगळवार दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या प्रवेश-फेरीसाठी महत्वाच्या सूचना**

१] प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी **दिनांक २७/०९/२०२२** रोजी संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी म्हणजेच Institute Level Vacancy Round साठी इच्छुक विद्यार्थ्यांनी या प्रवेश-फेरीसाठीची नोंदणी गुगल फॉर्म द्वारे माहिती भरून सबमिट करणे बंधनकारक असेल. गुगल फॉर्म द्वारे नोंदणी करण्यासाठीची कालमर्यादा **दिनांक २७/०९/२०२२** रोजी दुपारी ११:०० वाजेपर्यंतच असेल. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश फेरी साठी संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

- **गुरुवार दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या प्रवेश-फेरीसाठी महत्वाच्या सूचना**

१] प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी **दिनांक २९/०९/२०२२** रोजी संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी म्हणजेच Institute Level Vacancy Round साठी इच्छुक विद्यार्थ्यानी या प्रवेश-फेरीसाठीची नोंदणी गुगल फॉर्म द्वारे माहिती भरून सबमिट करणे बंधनकारक असेल. गुगल फॉर्म द्वारे नोंदणी करण्यासाठीची कालमर्यादा **दिनांक २९/०९/२०२२** रोजी दुपारी १:०० ते वाजेपर्यंतच असेल. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश फेरी साठी संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**<u>यासाठीची गुगल फॉर्म लिंक खालीलप्रमाणे आहे.</u>**

- **प्रथम वर्षासाठी गुगल फॉर्म लिंक :** https://forms.gle/mHykYdMEqJYVJxWSA
  इच्छुक विद्यार्थी खालील **QR- Code** Scan करून सुद्धा सदरील माहिती भरू शकतात.

- **थेट द्वितीय वर्षासाठी गुगल फॉर्म लिंक :** https://forms.gle/sLsxbdN3GScWbSes9
  इच्छुक विद्यार्थी खालील **QR- Code** Scan करून सुद्धा सदरील माहिती भरू शकतात.

First Year

Direct Second Year

२] या प्रवेश-फेरीसाठी उपस्थित राहतांना इच्छुक विद्यार्थी यांनी त्यांचे आवश्यक ते सर्व प्रमाणपत्रे, गुण-पत्रिका, दाखले इ. मूळ प्रत व झेरॉक्स सोबत बाळगणे बंधनकारक आहे. त्यांना लागू असलेले प्रवेश-शुल्क (फी) फक्त online पद्धतीने स्वीकारण्यात येईल. (फक्त Net-banking, Debit/ Credit Card) यासाठी कोणत्याही कारणास्तव अतिरिक्त वेळ देण्यात येणार नाही.

३ **अ] प्रथम वर्षासाठी दिनांक २४/०९/२०२२ व दिनांक २७/०९/२०२२**
**ब] थेट द्वितीय वर्षासाठी दिनांक २७/०९/२०२२ व दिनांक २९/०९/२०२२**

रोजी सकाळी ९:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येईल. (ज्यांनी गुगल फॉर्म भरलेला नाही असे वेळेवर येणारे विद्यार्थी यांचेसाठी ही अतिरिक्त व्यवस्था असेल.) दुपारी १:३० वाजता उपस्थित असलेल्या सर्व इच्छुक विद्यार्थ्यांची तात्पुरती-गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल. दुपारी १:४५ वाजेपर्यंत आक्षेप स्वीकारण्यात येतील. अंतिम गुणवत्ता यादी दुपारी २.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल.

४] दुपारी ०२:०० वाजता प्रत्यक्ष प्रवेश-प्रक्रिया सुरु करण्यात येईल. या प्रवेश-फेरीदरम्यान इच्छुक व हजर असलेले विद्यार्थी यांना Inter-se-merit नुसार म्हणजेच त्यांच्या गुणानुक्रमे पाचारण करण्यात येईल व त्यांना त्यावेळेस उपलब्ध असलेल्या रिक्त जागांपैकी त्यांचे पसंतीनुसार जागा हवी असल्यास त्यांचा प्रवेश निश्चित करण्यात येईल. एकदा प्रवेश नाकारल्यावर आणि ती जागा गुणानुक्रमे नंतर असलेल्या इच्छुक विद्यार्थ्याला देण्यात आल्यानंतर एकदा प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यास त्याच जागेसाठी कोणत्याही प्रकारे पुन: दावा करता येणार नाही.

५ ] ही प्रवेश-फेरी Dynamic असणार आहे. म्हणजेच एखादा विद्यार्थी यापूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये प्रवेशित झालेला असेल आणि अशा विद्यार्थ्यास त्याची शाखा बदलून इतर शाखेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्या विद्यार्थ्यास या फेरीत अशी संधी उपलब्ध असेल आणि त्याला शाखा बदलण्यासाठी पूर्वीची जागा रिक्त करून नवीन शाखा निवडता येईल. अशा विद्यार्थ्याच्या पूर्वी घेतलेल्या प्रवेशामुळे त्यावेळेस रिक्त नसलेली जागा प्रवेश-फेरीदरम्यान रिक्त होवू शकते.

७] अशी रिक्त झालेली जागा त्या वेळेस गुणानुक्रमे हजर असलेल्या पुढील विद्यार्थ्यास प्रवेश घेण्यासाठी उपलब्ध असेल व त्याची मागणी असल्यास त्याला त्या जागेवर प्रवेश घेता येईल.

८] प्रवेश-प्रक्रियेदरम्यान एका विद्यार्थ्यासोबत एकच पालक यांना प्रवेश देण्यात येईल.

<u>**महत्वाचे:**</u> या प्रवेश संस्था-स्तरावर राबविण्यात येणारी प्रवेश-फेरी (Institute Level Vacancy Round) दरम्यानचे प्रक्रीयेसाठीचे सविस्तर नियम २०२२-२३ करीताच्या Full Time Technical Diploma Courses Admission Information Brochure मधील मुद्दा क्र. १३ नुसार प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. (ही पाने संकेत-स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत).

--सही--
(डॉ.विठ्ठल श्री.बांदल)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

१३. **संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावार प्रवेश,–** विनाअनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, या जागांवरील प्रवेश प्रक्रिया खालील पद्धतीचा वापर करून पार पाडतील,-

(क) उपलब्ध जागांवर प्रवेश हे पारदर्शक रीतीने व ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व नंतर संस्थेकडे प्रवेशासाठी आवेदनपत्र सादर केलेले आहे अशा सर्व उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार करण्यात येतील;

(ख) प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने संस्थेची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील अशी पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका प्रकाशित करण्यात यावी. माहिती पुस्तिकेमधील सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी;

(ग) प्रत्येक संस्था प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेकडून प्रत्येक पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करतील व आवेदनपत्र मागवतील;

(घ) प्रवेशासाठी वेळोवेळी शासनाने अधिसूचित केलेले व समुचित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार हे संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांच्याकडे संस्था स्तरावरील प्रवेशासाठी नियम ७(५)(ख) मध्ये तरतूद केल्यानुसार आवेदनपत्र सादर करतील व या जागा ते या नियमांच्या नियम ८(३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरून तयार करण्यात आलेल्या परस्पर गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे भरतील;

(ङ) संस्था आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी करून, संस्थास्तरावर संस्थास्तरीय कोटयातील जागा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा, भारताचे समुद्रपार नागरिक/भारतीय वंशाच्या व्यक्ती / विदेशी विद्यार्थी /आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य कोट्यातून प्रवेश द्यावयाच्या उमेदवारांची गुणवत्ता यादी (याद्या) संस्थेच्या सूचनाफलकावर व संकेतस्थळावरसुद्धा प्रसिध्द करील;

(च) विनिर्दिष्ट केलेल्या पाठयक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशत: किंवा पूर्णत:) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल. तदनंतर संस्थास्तरीय कोट्यातील जागा प्रत्यार्पित करण्याची मुभा संस्थांना नसेल;

(छ) घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती संगणकीय (ऑनलाईन) प्रणालीमार्फत तात्काळ संस्था अद्ययावत करतील;

(ज) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जागा रिक्त राहिल्यास किंवा झाल्यास ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरीता राखून ठेवलेली होती, त्याप्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल. तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

(झ) या जागा भरताना परस्परांतील गुणवत्तेच्या आधारे, अखिल भारतीय उमेदवारांपेक्षा महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(त्र) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला महाराष्ट्र राज्य उमेदवार व अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार यांचा समावेश केल्यानंतर, जर मंजूर प्रवेश क्षमतेतील कोणतीही जागा रिक्त राहात असेल तर, या जागा, या जागा भरण्यासाठी समुचित प्राधिकरणाकडून मान्यता असण्याच्या अधीन राहून, अनिवासी भारतीय (एनआरआय), विदेशी नागरिक विद्यार्थी (एफएन), भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले (सीआयडब्ल्यूजीसी) ही उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून भरता येतील.